जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - २७/१०/२०२३**

पुणे शहर पोलीस आयुक्तालय मिनी मॅरेथॉन रॅली - २०२३

## फिट राईझ ७५ फिटनेस प्रोग्राम अंतर्गत आयोजीत मिनी मॅरेथॉन बाबत.

शासनाचे उपक्रमा अंतर्गत मा.अमित शहा,केंद्रीय गृह व सहकार मंत्री,भारत सरकार यांचे हस्ते एसव्हीपी-एनपीए, हैद्राबाद यांचेव्दारे फिट राईझ ७५ फिटनेस प्रोग्राम अंतर्गत समाजा मध्ये जनजागृती करण्यासाठी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.समादेशक,एसआरपीएफ ग्रुप नं.१ एसआरपीएफ ग्रुप नं.२, मा.पोलीस अधिक्षक,पुणे रेल्वे,मा.पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,मा.पोलीस अधिक्षक फोर्सवन यांचे वतीने संयुक्तपणे दि.२७/१०/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा.एसआरपीएफ ग्रुप नं.२, रामटेकडी, वानवडी, पुणे येथे मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मिनी मॅरेथॉन करीता मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर मा.समादेशक,एसआरपीएफ ग्रुप नं.१,व ग्रुप नं.२ मा.पोलीस अधिक्षक,पुणे रेल्वे, मा.पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण, मा.पोलीस अधिक्षक फोर्स वन यांचेकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

सदरची मिनी मॅरेथॉन स्पर्धास मा.अमित शहा,केंद्रीय गृह व सहकार मंत्री,भारत सरकार यांनी हैद्राबाद येथुन ऑन लाईन झेंडा दाखविल्या नंतर श्री.अंकित गोयल पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण यांनी सदर मॅरेथॉन स्पर्धेस झेंडा दाखवुन स्पर्धेस सुरूवात झाली सदरील स्पर्धा ही एसआरपीएफ ग्रुप नं.२,रामटेकडी, वानवडी, पुणे येथुन १०/०० सुरु होवुन ती आर्चरी ग्राऊंड-अलंकरण हॉल-ग्रुप नं.२ एमटी सेक्शन - ग्रुप नं.१ प्रवेशव्दार फोर्स वन कॉर्नर- एमआयएम कॉर्नर –नानवटीनगर कॉर्नर -गॅस गोडावुन ग्रुप नं.१ - ग्रुप नं.१ प्रवेशव्दार -अलंकरण हॉल-आर्चरी ग्राऊंड येथे ०५ किमी दौड करून मिनी मॅरेथॉन स्पर्धेचा १०/३५ वा समारोप झाला.

सदर स्पर्धेमध्ये श्री.संदिप दिवाण समादेशक एस आर पी ग्रुप १,श्री.अंकित गोयल पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,श्रीमती न्रमता पाटील समादेशक एस आर पी ग्रुप २,श्री.मितेश घट्टे अपर पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,श्री.गणेश शिंदे अपर पोलीस अधिक्षक,पुणे रेल्वे,श्री.रोहिदास पवार पोलीस उप आयुक्त मुख्यालय,पुणे शहर मा.सहा.पोलीस आयुक्त प्रशासन पुणे शहर श्रीमती पराजे मॅडम,सहा.पोलीस आयुक्त आभियान पुणे शहर श्रीमती रूक्मिनी गंलडे, मा.सहा.पोलीस आयुक्त बिनतारी संदेश पुणे शहर श्री.विवेक पवार असे हजर होते,

फिट राईझ ७५ फिटनेस प्रोग्राम अंतर्गत मिनी मॅरेथॉन मध्ये अंदाजे २००० पोलीस स्पर्धक व पोलीसांचे कुटूंबिय स्पर्धक सहभागी झाले होते.


75-day Fitness Programme-1
SVPNPA
NSG HQ
BRCDIVISION
15 NDRF


FIT RISE 75 PROGRAMME
पुणे पोलीस